मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमधील खड्डे दोन दिवसात बुजवा; आयुक्तांचे अधिकाऱ्यांना आदेश

## रस्ते दुरुस्तीसह दुभाजक, रेलिंग व पदपथांची कामे गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना; क्षेत्रीय कार्यालयांवर जबाबदारी निश्चित.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील रस्ते व सार्वजनिक सुविधांची सुरक्षितता आणि देखभाल यांना प्राधान्य देत महापालिका प्रशासनाने दुरुस्तीच्या कामांना गती दिली आहे. शहरातील रस्त्यांवरील खड्डे येत्या दोन दिवसांत बुजवण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

रस्त्यांवरील खड्ड्यांची पाहणी करून दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना सर्व विभागीय कार्यकारी अभियंते, उपअभियंते व कनिष्ठ अभियंते यांना देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या तक्रारींची प्रतीक्षा न करता अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्राची नियमित पाहणी करून आवश्यक बाबींची स्वतःहून नोंद घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. खड्डे बुजविताना कामाचा दर्जा, टिकाऊपणा आणि सुरक्षितता याबाबत विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या

दुरुस्तीच्या कामांवर प्रभावी देखरेख ठेवण्यासाठी अतिरिक्त महापालिका आयुक्त, मुख्य अभियंता आणि सह शहर अभियंता यांनी संबंधित कामांचा नियमित आढावा घ्यावा. खड्डे दुरुस्ती तसेच रेलिंग, दुभाजक आणि पदपथांच्या कामांची क्षेत्रीय कार्यालयनिहाय दररोज प्रगती तपासून त्याचा अहवाल आयुक्तांना सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुरुस्तीची कामे वेळेत, दर्जेदार आणि समन्वयाने पूर्ण करण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी परस्पर सहकार्याने कार्यवाही करावी. नागरिकांना सुरक्षित, सुस्थितीत आणि दर्जेदार रस्ते व सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून सातत्याने देखरेख आणि आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

नागरिकांना सुरक्षित, सुस्थितीत आणि दर्जेदार रस्ते तसेच सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देणे हे महापालिका प्रशासनाचे प्रमुख प्राधान्य आहे. त्यामुळे रस्त्यांवरील खड्डे तसेच रेलिंग, दुभाजक आणि पदपथांच्या दुरुस्तीची कामे तातडीने आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारची प्रतीक्षा न करता आपल्या कार्यक्षेत्रातील परिस्थितीची नियमित पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रत्येक क्षेत्राची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून, कामांमध्ये दिरंगाई किंवा हलगर्जीपणा आढळल्यास नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. या सर्व कामांचा दररोज आढावा घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.




### क्षेत्रीय कार्यालयनिहाय जबाबदारी निश्चित; दिरंगाई झाल्यास कठोर कारवाई

**» प्रत्येक विभागीय कार्यकारी अभियंता, उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्या कार्यक्षेत्रातील रस्ते आणि सार्वजनिक सुविधांच्या देखभालीची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना सोपविण्यात आलेल्या क्षेत्रीय कार्यालय व वॉर्डमधील कामांचे नियोजन, अंमलबजावणी आणि गुणवत्तेची तपासणी यावर लक्ष द्यावे. नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित कामांमध्ये दिरंगाई किंवा हलगर्जीपणा होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक ती कार्यवाही वेळेत पूर्ण करणे अपेक्षित आहे. सोपविण्यात आलेल्या क्षेत्रातील कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण न झाल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले आहे.**

### रस्त्यांसोबतच सार्वजनिक सुविधांच्या दुरुस्तीला प्राधान्य

**» रस्त्यांबरोबरच रेलिंग, दुभाजकांवरील बॅरिकेड्स, पदपथ तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित इतर सार्वजनिक सुविधांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय कामांचे नियोजन करून प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा आणि आवश्यक कामांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.**

---

# एक महिन्याचा वारी प्रवास पूर्ण.. माऊलींची पालखी आळंदीत दाखल

## ‘ज्ञानोबा-तुकाराम’च्या जयघोषात परतीचा सोहळा आळंदीत विसवला

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारी सोहळा पूर्ण करून संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा आज आळंदी नगरीत दाखल झाला. तब्बल महिनाभराचा पायी प्रवास, लाखो वारकऱ्यांची साथ, टाळ-मृदंगाचा गजर आणि ‘ज्ञानोबा-तुकाराम’च्या जयघोषाने दुमदुमलेला वारीचा प्रवास आज माऊलींच्या आळंदीच्या समाधी मंदिरात विसावला.

आळंदीहून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या माऊलींच्या पालखी सोहळ्याने विविध मुक्काम आणि टप्पे पार करत आषाढी एकादशीला पंढरपुरात प्रदक्षिणा मार्गाने विठ्ठल-रखुमाईच्या मंदिराला प्रदक्षिणा पूर्ण करत... पौर्णिमेला विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेत. परतीचा प्रवास सुरू झाला. पंढरपूरहून पुन्हा आळंदीच्या दिशेने निघालेल्या माऊलींच्या पालखी सोहळ्यात हजारो वारकरी सहभागी झाले होते



महिनाभराच्या या भक्तिमय प्रवासात ऊन, पाऊस, चिखल आणि विविध अडचणींची पर्वा न करता वारकऱ्यांनी माऊलींच्या चरणी आपली सेवा अर्पण केली. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि भगव्या पताकांनी सजलेला वारीचा मार्ग पुन्हा एकदा भक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला.

आता माऊलींच्या पालखीचे आळंदीत आगमन झाल्याने आषाढी वारीच्या या ऐतिहासिक आणि आध्यात्मिक प्रवासाची सांगता झाली आहे. महिनाभराचा खडतर प्रवास पूर्ण करून माऊली पुन्हा आपल्या आळंदीत दाखल झाल्याने वारकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# जाधववाडीत रस्त्यांची चाळण अन् गटारी तुंबल्या, प्रशासनाच्या अनास्थेमुळे नागरिक त्रस्त

## वारंवार तक्रारी करूनही महापालिकेचे अधिकारी या समस्येकडे दुर्लक्ष करत असून नागरिकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

जाधववाडी परिसरातील वडाचा मळा ते बोलाई मळा या रस्त्यावर गेल्या तीन महिन्यांपासून भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. तुंबणारी गटारे, संपूर्ण रस्त्यावर पडलेले मोठमोठे खड्डे या समस्यांनी नागरिक त्रस्त आहेत. वारंवार तक्रारी करूनही महापालिकेचे अधिकारी या समस्येकडे दुर्लक्ष करत असून नागरिकांच्या आरोग्याचा आणि सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.





जाधववाडीतील वडाचा मळा, बोलाई मळा, सावता माळी मंदिर ते हॉटेल निसर्ग परिसर आणि सिटी प्राईड रस्ता या संपूर्ण भागात ड्रेनेज लाईनची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी गटारी तुंबून मैला पाणी रस्त्यावर येत असल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनीही ठराविक ठिकाणी ड्रेनेजच्या पाईपलाईन बदलणे आवश्यक असल्याचे प्रशासनाला सांगितले आहे, तरीही यावर कोणतीही कारवाई झालेली नाही.

दुसरीकडे, रस्त्यांची चाळण झाल्याने वाहनचालकांना खड्ड्यातून मार्ग काढताना कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी तर पथदिव्यांच्या समस्येमुळे या धोकादायक रस्त्यावरून प्रवास करणे जीवावर बेतू शकते अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.





स्थानिक नागरिकांनी आणि प्रतिनिधींनी महापालिकेच्या स्थापत्य व आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांकडे जाब विचारला असता, 'आमच्याकडे सध्या निधी उपलब्ध नाही आणि कामासाठी ठेकेदारही नाही' अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन अधिकारी आपली जबाबदारी झटकत आहेत.

नागरिकांकडून नियमित कर (टॅक्स) वसूल केला जात असताना कामासाठी निधी नाही हे सांगणे हा प्रशासनाचा बेजबाबदारपणा असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे. येत्या सोमवारपर्यंत महापालिकेने या भागातील रस्ते दुरुस्ती आणि ड्रेनेज लाईनचे काम सुरू केले नाही, तर महापालिका प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा रहिवाश्यांनी दिला आहे.

> "जाधववाडीतील वडाचा मळा ते बोलाई मळा रस्त्यावर ड्रेनेज तुंबणे, खड्डे आणि पथदिव्यांचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अधिकारी निधी नाही आणि ठेकेदार नाही अशी कारणे सांगत आहेत. आम्ही भरलेला कर मग जातो कुठे? महापालिका आयुक्तांनी या निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. येत्या सोमवारपर्यंत जर जाधववाडीतील कामांना सुरुवात झाली नाही, तर आम्ही नागरिकांकडून भीक मागून निधी गोळा करू आणि तो महापालिकेला देऊन 'भीक मागो' आंदोलन करू."
>
> **- विशाल विलास आहेर, युवानेते, सामाजिक कार्यकर्ते.**

> "जाधववाडी परिसरातील प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेण्यात येत आहे. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्याचे निर्देश देत आहे. निधी व ठेकेदाराबाबत असलेल्या तांत्रिक बाबी लवकरात लवकर दुरुस्त करून ड्रेनेज लाईन व रस्ते दुरुस्तीचे काम प्राधान्याने पूर्ण केले जाईल."
>
> **- अजय सूर्यवंशी, सह शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# पिंपरी-चिंचवडमध्ये कचरा व्यवस्थापनाचा नवा अध्याय सुरू

## आमदार अमित गोरखे यांच्या हस्ते 'नवी दिशा-शून्य कचरा झोपडपट्टी प्रकल्पाचे' भूमिपूजन संपन्न

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील दत्तनगर येथे पर्यावरणपूरक व शाश्वत विकासाचा नवा आदर्श प्रस्थापित करणाऱ्या 'नवी दिशा – शून्य कचरा झोपडपट्टी प्रकल्प' या पिंपरी चिंचवड शहरातील पहिल्याच महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा भव्य भूमिपूजन सोहळा आमदार अमित गोरखे यांच्या हस्ते गुरूवारी, ६ ऑगस्ट रोजी अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. हा प्रकल्प पिंपरी-चिंचवडच्या स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाच्या इतिहासात मैलाचा दगड ठरणार आहे.



'स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत पिंपरी-चिंचवड घडविण्याच्या आपल्या संकल्पाला हा प्रकल्प अधिक बळ देणार आहे. नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी कचऱ्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन काळाची गरज आहे. हा उपक्रम दत्तनगरसह संपूर्ण पिंपरी-चिंचवडसाठी विकासाची नवी दिशा ठरत असून, भविष्यात अशा प्रकल्पांचा विस्तार संपूर्ण शहरात केला जाईल,' असा विश्वास आमदार अमित गोरखे यांनी यावेळी व्यक्त केला.

या महत्त्वपूर्ण सोहळ्याला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसेविका अनुराधा गोरखे, नगरसेवक तुषार हिंगे, नगरसेविका सुप्रिया चांदगुडे, नगरसेवक कुशाग्र कदम, क्षेत्रीय अधिकारी श्रीमती निवेदिता घार्गे, आरोग्य अधिकारी राजू साबळे, आकार सोल्युशन्सच्या विजया कुचेकर आणि सायडा संस्थेचे कार्यकारी संचालक प्रवीण जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच श्रीराम सेवा ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रभाग क्रमांक १० मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये..

» **शहरातील पहिला प्रकल्प:** हा उपक्रम शहरातील झोपडपट्टी, तसेच इतर सर्व भागातील कचरा व्यवस्थापनासाठी राबविला जाणारा पहिलाच अभिनव प्रकल्प आहे. **वैज्ञानिक दृष्टीकोन:** कचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी हा प्रकल्प वैज्ञानिक पद्धतीने राबविला जात आहे. **लोकसहभाग:** हा केवळ स्वच्छतेचा उपक्रम नसून लोकसहभागातून उभारला जाणारा एक शाश्वत विकासाचा आदर्श पॅटर्न आहे.

# वृक्ष प्राधिकरण समितीच्या पहिल्याच बैठकीत प्रशासन धारेवर !

## बेकायदा वृक्षतोडीवर दोषींवर कारवाईचे आदेश; आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली बैठक.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजाविणाऱ्या पुणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक नुकतीच पार पडली. महापालिकेचे सभागृह अस्तित्वात आल्यानंतर गेल्या महिन्यात सर्वसाधारण सभेमध्ये या समितीची स्थापना करण्यात आली. समितीच्या पहिल्याच बैठकीमध्ये शहरात वृक्षतोडीची परवानगी देताना केल्या जाणाऱ्या चुकांकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. शहरात वृक्षतोडीची परवानगी देताना महापालिकेचे अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करतात का? बांधकाम प्रकल्पांना अडचण ठरणारी ५०० झाडे तोडण्यास कशी परवानगी दिली? तज्ज्ञ समितीच्या सूचनांकडे दुर्लक्ष का केले, अशा अनेक प्रश्नांनी महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीची पहिली बैठक गाजली.

चुकीच्या पद्धतीने देण्यात आलेल्या वृक्षतोडीच्या प्रस्तावांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची सूचनादेखील या बैठकीत समितीच्या सदस्यांनी महापालिका प्रशासनाला केली. यापूर्वी शहरात देण्यात आलेल्या वृक्षतोडीच्या परवानगीची सविस्तर माहिती समिती पुढे सादर करण्यात यावी अशा सूचनाही करण्यात आल्या.

महापालिकेच्या निवडणुकीनंतर मागील महिन्यात सर्वसाधारण सभेत वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्यांची निवड करून वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना करण्यात आली. या समितीची पहिली बैठक झाली. महापालिका आयुक्त तथा वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. या वेळी वृक्ष प्राधिकरण समितीचे नवनिर्वाचित सदस्य शैलजीत बनसोडे, विशाल मलके, नगरसेविका रूपाली पवार, कोमल नवले, उज्ज्वला जंगले, शैलेंद्र बनसोडे, स्नेहा माळवदे, अंजली ओरसे यांच्यासह सहआयुक्त तथा समितीचे सदस्य सचिव डॉ. अशोक घोरपडे, सहाय्यक आयुक्त, हॉर्टिकल्चर मिस्त्री उपस्थित होते.




### वृक्षतोडीच्या परवानग्यांवर प्रश्नचिन्ह

**» पुणे महापालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीच्या पहिल्याच बैठकीत शहरातील वृक्षतोडीच्या परवानग्यांवर सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. बांधकाम प्रकल्पांसाठी तब्बल ५०० झाडे तोडण्यास परवानगी कशी देण्यात आली, अधिकारी प्रत्यक्ष पाहणी करतात का, असे सवाल उपस्थित करण्यात आले. तज्ज्ञ समितीच्या सूचनांकडे दुर्लक्ष का झाले, याबाबतही प्रशासनाला जाब विचारण्यात आला. चुकीच्या पद्धतीने दिलेल्या परवानग्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी सदस्यांनी केली. यापुढे वृक्षतोडीच्या प्रत्येक प्रस्तावाची काटेकोर तपासणी करूनच निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.**

### वृक्षसंवर्धनासाठी कडक अंमलबजावणीची मागणी

**» शहरातील वृक्षसंपदेचे संरक्षण, संवर्धन आणि जतन करण्यासाठी कायदेशीर तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर समितीच्या बैठकीत भर देण्यात आला. कोणाच्याही फायद्यासाठी बेकायदा वृक्षतोडीस परवानगी दिली जाऊ नये, अशी स्पष्ट भूमिका सदस्यांनी मांडली. यापूर्वी देण्यात आलेल्या सर्व वृक्षतोड परवानग्यांची माहिती समितीसमोर सादर करण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीत अधिक पारदर्शकता आणि जबाबदारीची गरज व्यक्त केली.**

### ५०० झाडांच्या प्रस्तावावर सदस्य आक्रमक

**» कोरेगाव पार्क आणि ढोले-पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ५०० झाडे तोडण्याच्या प्रस्तावावर समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. सर्वसामान्य नागरिक आणि बांधकाम व्यावसायिकांना वेगवेगळे निकष लागू केले जातात का, असा सवाल सदस्यांनी उपस्थित केला. याशिवाय साडेतीन हजार झाडे नेमकी कुठे लावण्यात आली, वृक्षतोडीसाठी कोणते निकष वापरले गेले, याची माहिती मागवण्यात आली. प्रशासनाने दिलेल्या उत्तरांवर सदस्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे या प्रकरणाचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले..**

---

# पुणे महापालिकेत चर्चा, आदेश, राज्यमंत्र्यांच्या बैठकीत काय घडले !

## मेट्रो कामांनंतर रस्त्यांवर पडून राहिलेला राडारोडा तातडीने उचलण्याचे अन् खोदलेले रस्ते पूर्ववत करण्याचे आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील नागरी समस्या आणि रखडलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधींची बैठक पुणे महापालिकेत पुन्हा एकदा पार पडली. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत प्रशासनाला कडक शब्दांत सूचना देण्यात आल्या. पावसामुळे शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे, रस्त्याची दुरवस्था झाल्याने निर्माण होणारी वाहतूक कोंडी, अपुरे घनकचरा व्यवस्थापन, अतिक्रमणे, मेट्रो प्रकल्प आणि अन्य काही प्रकल्पांच्या कामांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. त्यानंतर कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना आणि आदेश प्रशासनातील अधिकाऱ्यांना दिले गेले. त्यानंतर बैठकीची सांगता झाली.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीसाठी महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, आमदार हेमंत रासने, भीमराव तापकीर, महापालिकेचे सभागृह नेते गणेश बिडकर, स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, मेट्रो प्रकल्प व्यवस्थापक धनंजय गाडगीळ यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

शहरातील विविध प्रकल्पांचा आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आढावा बैठकीत घेण्यात आला. महात्मा फुले मंडई येथील गाळ्यांचा भाडेवाढीचा प्रस्ताव, मेट्रो प्रकल्पांतर्गत तयार करण्यात आलेल्या गाळ्यांच्या वाटपावर या बैठकीत चर्चा करण्यात आली.



### 'क्लस्टर डेव्हलपमेंट'चा आढावा

**» पावसाळ्यात धरणातून पाणी सोडल्यानंतर पुराचे पाणी नरवीर तानाजी मालुसरे (सिंहगड) रस्त्यावरील एकतानगरी, निंबसनगर आणि विठ्ठलवाडी परिसरात पाणी शिरते. या भागात महापालिकेने क्लस्टर डेव्हलपमेंट प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याचा आढावा बैठकीत घेण्यात आला. प्रकल्पाच्या प्रगतीतील अडचणी दूर करून कामाला गती देण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. सिंहगड रस्ता परिसरातील भूसंपादन प्रक्रियेला गती देऊन रस्त्यांशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.**

# पुणे विमानतळावरील विमान उड्डाणांना अडथळा... हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी नोंदवले महत्वाचे निरीक्षण

## धावपट्टीवर हाय डेसिबल गन, गवताची छाटणी आणि गस्ती पथक; हवाई दलाकडून प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगाव येथील पुणे विमानतळावरून नागरी आणि हवाई दलाच्या लष्करी विमानांच्या सुरक्षित उड्डाणांना घार आणि अन्य पक्ष्यांचा अडथळा होत आहे. विमानतळाच्या आजूबाजूला उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याकडे पक्षी, श्वान आकर्षित होत असून, विमानांचे उड्डाण, उतरण्याच्या मार्गात ते त्रासदायक अडथळा ठरत आहेत,' असे निरीक्षण हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी नोंदवले. त्यामुळे विमानतळावरील धावपट्टीच्या परिसरात मानवी गस्तीसह विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले,'लोहगाव येथे हवाई दलाचा तळ आहे. तसेच, या विमानतळावरून नागरी विमानसेवाही मोठ्या प्रमाणात चालते. विमानतळावरून दररोज सरासरी २४० नागरी उड्डाणे होतात, तर वर्षाला सुमारे ७२ हजार उड्डाणांची नोंद होते. पुण्यात साधारणपणे २०० जातींचे पक्षी आढळतात; त्यांपैकी सुमारे २० प्रजाती विमानांच्या उड्डाण क्षेत्रात नियमितपणे दिसून येतात. या सर्व पक्ष्यांमध्ये आकाराने मोठी असलेली आणि उंचावर घिरट्या घालणारी घार सर्वाधिक त्रासदायक आहे. देशभरात २०२० ते जून २०२५ या कालावधीत ५ हजार ७४० पक्षिधडकेच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. या घटनांमध्ये ८०४ विमानांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे पक्षिधडकेचा प्रश्न हा विमान सुरक्षेपुढील गंभीर आव्हान ठरत आहे.'

'विमानतळाच्या परिसरात स्वच्छता असणे आवश्यक आहे. मात्र, उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याच्या ढिगांकडे पक्षी आकर्षित होतात. तसेच, भटके श्वानही मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यात पक्ष्यांना पांगवण्यासाठी विशेष पथक, मोठा आवाज निर्माण करणाऱ्या उपकरणांचा (हाय डेसिबल झोन गन) वापर, पक्ष्यांचा अधिवास कमी करण्यासाठी धावपट्टीजवळील गवताची छाटणी, धावपट्टी आणि विमानतळ परिसरात सातत्याने गस्त घालणे अशा उपाययोजनांचा त्यात समावेश आहे. मात्र, पक्षी, भटके श्वान, उघड्यावर फेकला जाणारा कचरा या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी वायुदलाने जिल्हा प्रशासन, पुणे महापालिकेचे अधिकारी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे, त्याबाबत बैठकाही झाल्या आहेत. प्रशासनाकडून त्यांच्या स्तरावर कार्यवाही केली जाते,' असे हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले.



### सहा महिन्यांच्या शोधानंतर बिबट्या जेरबंद

**» काही महिन्यांपूर्वी विमानतळाच्या परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे निदर्शनास आले होते. भटके श्वान उघड्यावर टाकला जाणारा कचरा खातात. या श्वानांच्या मागे बिबट्याही विमानतळाच्या परिसरात आला. विमानतळाच्या परिसरात बिबट्या दडून राहिला होता. सुमारे सहा महिने प्रयत्न केल्यानंतर बिबट्याला जेरबंद करण्यात आले,' अशी माहिती हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली.**

### 'ड्रोन'चा ताप

**» 'सुरक्षेच्या कारणास्तव लोहगाव विमानतळाच्या परिसरात ड्रोन उडवण्यास पूर्णपणे बंदी आहे. मात्र, आता ड्रोन सहज उपलब्ध होत असल्याने विमानतळापासून प्रतिबंधित क्षेत्रात ड्रोन उडवले जात असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. असे प्रकार आढळल्यावर पोलिसांत तक्रार दाखल केली जाते. मात्र, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होण्याची गरज आहे,' असे हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.**

### 'नागरिकांनी संवेदनशीलता दाखवणे गरजेचे'

**» 'देशातील अन्य शहरांप्रमाणे पुणे विमानतळाच्या अंतर्गत परिसरासह बाहेरील परिसरही प्रसन्न वाटला पाहिजे. त्यासाठी नागरिकांनीही संवेदनशीलता दाखवून विमानतळाच्या बाहेरील परिसरात स्वच्छता राखण्यासाठी योगदान देणे गरजेचे आहे. त्यासाठी जागृतीची आवश्यकता आहे,' असे हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले.**

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये सर्वाधिक कोंडी कुठे? आयटीयन्सच्या सर्वेक्षणातून टॉप 10 ठिकाणे समोर

## प्रशासनाकडून वर्षभर केवळ वेळकाढूपणा; पादचाऱ्यांसाठी सुरक्षेचा अभाव आणि पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था कायम

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट बनली आहे. 'अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क' या आयटी कर्मचाऱ्यांच्या सर्वेक्षणातून सर्वाधिक कोंडीची १० ठिकाणे समोर आली असून तिथे आयटीयन्स दररोज तासनतास अडकून पडत आहेत. विशेष म्हणजे, आयटी पार्कमध्ये सार्वजनिक वाहतुकीचा वापर नगण्य असून, खासगी मोटारी आणि दुचाकीचा वापर सर्वाधिक होत असल्याचे वास्तवही या सर्वेक्षणातून उघड झाले आहे.

आयटी पार्कमधील वाहतूककोंडीसह पायाभूत सुविधांची समस्या सोडविण्यासाठी गेल्या वर्षी 'अनक्लॉग हिंजवडी आयटी पार्क' ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेनंतर वर्षभरात काय घडले याचा आढावा सर्वेक्षणाद्वारे आता घेण्यात आला आहे. सर्वेक्षणात आयटी कर्मचाऱ्यांना आयटी पार्क परिसरातील सर्वाधिक कोंडीची ठिकाणे विचारण्यात आली होती. त्याचबरोबर दैनंदिन प्रवासात सर्वाधिक अडचणी कोणत्या येतात, याबद्दलही आयटी कर्मचाऱ्यांना विचारण्यात आले होते. त्यात बहुसंख्य कर्मचाऱ्यांनी रस्ता ओलांडण्यासाठी पादचाऱ्यांसाठी सुरक्षित जागा नसल्याचे म्हटले आहे. याच वेळी रस्त्यांवरील अतिक्रमण, पदपथ नसणे, अरुंद रस्ते, अपुरे वाहनतळ, सिग्नलच्या वेळा, शेवटच्या टप्प्यातील वाहतुकीचा पर्याय नसणे या समस्यांकडे कर्मचाऱ्यांनी बोट दाखविले आहे.

आयटी कर्मचाऱ्यांकडून कोणत्या प्रवासी वाहनांचा वापर केला जातो, असा प्रश्न सर्वेक्षणात विचारण्यात आला होता. त्यात बहुसंख्य कर्मचारी हे स्वत:च्या मोटारीचा वापर करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्या खालोखाल दुचाकीधारक कर्मचाऱ्यांचे प्रमाण आहे. कॅब आणि कंपनी बसने प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. विशेष म्हणजे, अनेक कर्मचारी सायकलने प्रवास करण्यास प्राधान्य देत आहेत. पीएमपीने प्रवास करणाऱ्यांचे प्रमाण मात्र नगण्य आहे.



### सर्वाधिक कोंडीची १० ठिकाणे

**»१) लक्ष्मी चौक २) विप्रो सर्कल ३) भूमकर चौक ४) वाकड पूल ५) हिंजवडी पूल ६) माण रस्ता ७) फेज १ सर्कल ८) इन्फोसिस सर्कल ९) फेज २ १०) मारुंजी**